Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर व कामगार कल्याण

**शिवाजी दामाजी लहाने**
एम.ए., (म.फुले-डॉ. आंबेडकर विचारधारा)

**प्रस्तावना :-**

भारतातील कामगारांच्या समस्या बाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरा शिवाय अन्य कोणत्याही विचारवंतानी डोळसपणे विचार केलेला नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कामगारांना केवळ कामगार म्हणून न पाहता तो प्रारंभी एक व्यक्ती आहे. याचा विसर ते कधीही पडू देत नाहीत. एक व्यक्ती, एक मुल्य, व्यक्ती स्वातंत्र्य, संधीची समानता आणि सत्तेतील सहभाग हे आपले जीवनमूल्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार वर्गाला लागू करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे अर्थतज्ञ होते. अर्थशास्त्र या विषयाचे ते गाढे अभ्यासक होते ते त्याच विषयात पी.एच.डी होते म्हणूनच त्यांचा अर्थशास्त्र हा चिंतनाचा विषय होतो. अर्थशास्त्राचा श्रमाशी व श्रमिकाशी निकटचा संबंध येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आर्थिक तत्वज्ञानात व चिंतनात श्रमिक हाच केंद्रबिंदू राहीला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भांडवलाच्या बेकारीपेक्षा श्रमिकांची बेकारी राष्ट्राच्या अर्थकारणाला अधोगतिकडे घेऊन जाणारी ठरले असा इशारा ही त्यांनी तत्कालीन इंग्रज सरकारला ते देतात.

भारतीय शेतमजूर व कामगार वर्गाच्या हिताच्या रक्षणार्थ १९३६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजुर पक्षाची स्थापना केली. 'स्वतंत्र मजूर पक्षाच्या' जाहीर नाम्यात कामगार वर्गाच्या हितास विशेष प्राधान्य दिल्याचे दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपली कामगार विषयक भूमिका मांडताना जाहीरनाम्यात म्हणतात, लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक त्याप्रसंगी देशातील उद्योग धंद्याची मालकी व्यवस्था सरकारने आपल्याकडे घ्यावी. कामगार वर्गाचे जीवनमान उंचावण्यासाठी वेतनाची मर्यादा ठरविण्यात यावी. कारखान्यातील कामगार वर्गाच्या हितासाठी कायमस्वरुपी नोकरी बडतर्फी, पगारवाढ यावर सरकारचे नियंत्रण असायल पाहीजे. कामगारांच्या कामाचे तास निश्चित, योग्य वेतन, पगारी रजा, निवृत्ती वेतन कामावर असतांना आपघात झाला तर नुकसान भरपाईची तरतूद, विम्याची सुविधा आणि आरोग्य निवासस्थानाची व्यवस्था इत्यादी मुद्यांना 'स्वतंत्र मजूर पक्ष' विशेष प्राधान्य देईल. त्याच प्रमाणे बेकारी निवारण करण्याची जबाबदारी ही सरकारची आहे. बेकार कामगारांना काम मिळवून देण्याबाबत हा पक्ष सरकारकडे पाठपूरावा करेल असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात. प्रशासनात सर्व जाती धर्मीयांना उचित प्रतिनिधीत्व मिळवून देण्यास स्वतंत्र मजूर पक्ष कटीबध्द आहे. अशा प्रकारा कामगार वर्गाबाबतीच भूमिका स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात नमूद करण्यात आलेली आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्वतंत्र मजूरपक्ष कामगारांना अधिक जवळचा वाटू लागला. त्याचाच परिणाम म्हणजे १९३७ च्या मुंबईच्या विधानसभा निवडणूकी मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाने १८ जागा जिंकल्या. सभागृहात स्वतंत्रमजूर पक्ष दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला. इ.स. १९३८ च्या औद्योगिक / विवादाच्या विधेयकास स्वतंत्र मजूरपक्षाने कडाडून विरोध केला. या विरोधाचाच एक भाग म्हणून स्वतंत्र मजूरपक्षाने ७ नोव्हेंबर १९३८ रोजी एक व्यापक स्वरुपाचा संप घडवून आणला.

मुंबईच्या कामगार मैदानावर विराट अशी सभा आयोजित करण्यात आली. सरकारने ही सभा होऊ नये यासाठी पोलिस बळाचा पावर केला. सभाकर्त्यांवर पोलिसांनी गोळीबार केला. काही कामगार कार्यकर्ते मारले गेले. तरी स्वतंत्र मजूर पक्षाची सभा संपन्न झालीच. यावरुन कामगारांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वावर प्रचंड विश्वास असल्यचे निष्पन्न होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या जीवनात एक पहाट निर्माण करुन त्यांना त्यांचे हक्क त्यांच्या हक्काची जाणीव करुन त्यांना एक नवी प्रेरणा दिली. १९३८ मुंबईच्या विधीमंडळामध्ये कामगारांचा संप करण्याचा हक्क नाकारण्या करिता 'ट्रेड डिस्पुट बील' आणले. तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संपा बाबत आपले विचार मांडले असता सरकारला चांगले सुनावले की, संप हे स्वातंत्र्याच्या हक्कालाच दिलेले दुसरे नांव आहे. तुम्ही जर मनुष्याला स्वातंत्र्याचा हक्क कबुल करता तर प्रत्येक कामगाराला संप करण्याचा अधिकार आहे. हे तुम्हाला कबुल करावे लागेल. कामगारांचा संप कोण्त्याही कायद्याने बोकायदेशीर ठरु शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खंबीरतेने कामगारांची बाजु मांडली. त्यामुळे ब्रिटीश मुत्सदी 'सर स्टॅफर्ड क्रिप्सने' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रश्न विचारला की, तुम्ही कामगाराचे पुढारी आहे का दलिताचे पुढारी आहात? यावरुन असे लक्षात येते की, कामगारा बाबत एवढी निष्ठा त्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरा शिवाय दुसऱ्या कोणत्याच नेत्याकडे दिसून येत नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगारांना सतत सांगत असत की, भारतीय कामगाराचे दोन प्रमुख शत्रु आहे. ते दोन शत्रु म्हणजे एक ब्राम्हण शाही आणि दुसरी भांडवलशाही. ब्राम्हणशाही विषयी बोलताना म्हणतात, ब्राम्हणशही म्हणजे स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्वाना विरोध करणारी मानसिकता होय. कामगारचळवळीस सामाजिक संदर्भाची जोड दिल्यामुळेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आणि कम्युनिस्टांचे कधीच पटले नाही. कमिन्युस्टचे अंतिम ध्येय कामगाराची हुकूमशाही प्रस्थापित करणे हे होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार चळवळीकडे समाजाच्या पुनर्रचनेने एक साधन म्हणून पाहत होते. आर्थिक शोषणाविरुध्द आगपखाड करणारे कम्युनिस्ट सामाजिक व धार्मिक गुलामगिरी बाबत मौन बाळगून असायचे ही वृत्ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पटत नव्हती.

कामगारांचा लढा समर्थपणे लढणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना १९४२-१९४६ या कालखंडात भारताचे मजूर मंत्री म्हणुन काम करण्याची संधी प्राप्त झाली. ब्रिटीशांच्या मंत्रीमंडळात मजूर मंत्रीपदावर असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय कामगाराकरीता अनेक दुरोगामी स्वरुपाच्या सुधारणा केलेल्या आहेत. त्यातील काही प्रमुख सुधारणा त्यांनी कायद्याच्या माध्यमातून मांडल्या आहेत.कोळसा खानितील स्त्री कामगारास बाळंतपणाच्या काळात अठ्ठाविस दिवस प्रसुती भत्ता देण्यात यावा. (दररोज आठ आणे)

कारखानदाराने कामगारांच्या युनियनला मान्यता द्यावी. कामगार युनियनला मान्यता न देणे हा कारखानदारांचा दंडनीय गुन्हा समजण्यात येईल. कोळशाच्या खानित काम करणाऱ्या पुरुष कामगार व स्त्री कामगारांना समान वेतन देण्यात येईल. कामगाराच्या नेमणूकीच्या अटी कारखानदारांऐवजी भारत सरकार निश्चित करेल. १९३६ मध्ये 'जिनेव्हा' येथील आंतरराष्ट्रीय मजूर परिषदेने एका वर्षात कामागारांना सहा पगारी रजांची मान्यता दिली होती. त्यात एका रजेची भरत घालून भारतातील कामगारांना सात दिवसांची पगारी रजा (सी.एल) देण्यात येतील. कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यात २५० रुपये वाढ करण्यात आली. (१९४४) कोळसा कच्चामाल इत्यादीच्या तुटवड्यामुळे कारखाना बंद करावा लागल्यास कारखानदाराने त्या कारखान्यातील कामगारांना त्यांच्या पगाराच्या ७५ टक्के रक्कम पहील्या पंधरवाड्यात व दुसऱ्या पंधरवाड्यात पन्नास टक्के रक्कम भरुन नुकसान भरपाई द्यावी. कामगार न्यायालयाच्या (ट्रायब्युनल) परवानगी शिवाय कोणत्याही कारखानदारांना कामगारास कामावरुन काढून टाकता येणार नाही. स्त्री कामगारांना चौदा आठवड्याची प्रसुती रजा देण्यात आली. या चौदा आठवड्याच्या (९८ दिवस) प्रसुती भत्ता देण्यात यावा. कायद्याने कामगारांस मिळणारे फायदे जर कारखान दाराने दिले नाही तर त्या कारखानदारावर सरकार खटले दाखल करेल. कामगाराना त्याचे फायदे मिळवून देणे हे सरकारचे कर्तव्य आहे. आजारपणे, आपघात व अधिकृत रजा ह्या नव्वद दिवसांच्या असतील (१९४५) नुकसान भरपाई देत असतांना कामगाराच्या वेतनाची कमाल मर्यादा ३००/- रुपयाची होती. ती आता ४००/- रुपये इतकी

करण्यात आली (१९४६) बारामहीने चालु असणाऱ्या कारखान्यातील कामगारांना आठवड्यास ४८ तासाची कमाल मर्यादा ठरविण्यात आली. दररोज ८ तास कामाची मर्यादा ठरविण्यात आली. ती आजही कायम आहे. तसेच हंगामी स्वरुपाच्या कारखान्यातील कामगाराकरी ता आठवड्यास ५४ तासाची कमाल मर्यादा ठरविण्यात आली. त्यांना दररोज नऊ तासांची कमाल मर्यादा मान्य करण्यात आली. (१९४६)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारताचे मजूरमंत्री असतांना भारतात बारा महिने व इंगामी स्वरुपाच्या कारखान्यातील कामगारांची संख्या २५, २०, २५१ एवढी होती. या सर्वांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेल्या उपरोक्त सुधारणाचा लाभ झाला. वरील कामगार सुधारणाचा विचार केला तर संशोधकांचा आव आणणाऱ्या अरुण शौरीने आपल्या वर्शिपिंग फॉल्स गॉडस या त्यांच्या पुस्तकामध्ये प्रश्न उपस्थित केले. त्याची उत्तर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर १९४२ मध्ये काय करीत होते. या प्रश्नांची उत्तरे सापडते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगार सुधारणा ह्या सर्व जाती धर्माच्या कामगारां करीता होत्या. त्या केवळ मागासवर्गीय कामगारांकरिता नव्हत्या यांचा विसर सध्या पडत आहे तो विसर पडता कामा नये.

स्वतंत्र भारताची राज्यघटना निर्मितीचे कामही डॉ. बाबासाहेब आंबेडकराकडे आले. त्यांनी कामगारांच्या जीवनामध्ये स्थिरता व निश्चितीतता आणलेली आहे. हे कोणालाही नाकारता येणार नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय कामगारांचे मसिहा ठरतात.

**समारोप**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या कामगाराच्या जीवन योगदानाचा आधार घेत कामगारांसाठी आण्णाभाऊ साठे यांनी म्हटले आहे की ही "पृथ्वी शेषनागाच्या डोक्यावर तरली नसून ती खऱ्या अर्थाने कामगारांच्या तळहातावर तरलेली आहे". कामगारांच्या जीवनात बदल करण्यासाठी ज्या डॉ. बाबासहेब आंबेउकर यांनी कामगारांच्या कल्याणासाठी केलेल्या अनेक उपाययोजना व भारतीय राज्य घटनेच्या माध्यमातून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्याच्या माध्यमातून लागू केला आहे. परंतु इथले राज्यकर्ते मंडळी हीच उद्योगपती कारखानदार असल्या कारणाने त्याच्या पचनी पडत नव्हते. म्हणून आण्णाभाऊ साठे म्हणतात. "देश की आझादी झुठी है देश की जनता भुकी है। भारतातील सर्व कामगारांना याचा विसर पडत चालत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरयांनी आपल्या जीवाची पर्वा न करता आपले आयुष्य हे कामगाराच्या कल्याणासाठी त्याची प्रश्नाची सोडवणुक होण्यासाठी आयुष्य खर्ची घातले आहे. ज्या पध्दतीने आज कामगार नेत्यांनी, संघटनांनी काम करावयास पाहीजे त्या प्रमाणात दिसत नाही. आजही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी राज्यघटनेमध्ये कामगारांना दिलेले अधिकार कामगार हिताचे आहेत. त्यासाठी कामगार नेत्यांनी कामगार संघटनानी योग्य काम केल्यास कामगारांना न्याय निश्चितच मिळेल व आजचे कामगारांच्या जीवावर उठलेले सरकारचे कामगार धोरण हातून पडले म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविलेले कामगाराच्या कल्याणाचे, त्यांच्या विविधी प्रश्नांचे, समस्यांचे निराकरण करणे गरजेचे आहे. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुचविलेल्या विचारांची आज सद्यस्थितीत काळाची गरज आहे.

**संदर्भ :-**

१. आंबेडकरी चळवळ, य.दी.फडके
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर रायटिंग स्पीचेस
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ-महाराष्ट्र शासन प्रकाशित २००२
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-१
५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड-२ व ३